सोमवार, दि. २ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २९७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मोकाट कुत्र्यांचा हैदोस

### एकाच दिवशी वेगवेगळ्या घटनेत तीघांना कुत्र्याचा चावा; सात वर्षीय मुलाचा समावेश

**जालना । प्रतिनिधी** - शहरात मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातला आहे. एका चिमुकलीला कुत्र्याने चावा घेतल्यामुळे ती दगावल्याची घटना शहरात काही दिवसांपुर्वी घडली होती. ही घटना ताजी असतांनाच आता एकाच दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी तीघांना कुत्र्यांने चावा घेतल्याची घटना घडली आहे. यात सात वर्षीय एका मुलाचा समावेश आहे. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी पुन्हा एकदा पुढे येऊ लागली आहे.

यात रहेमान गंज येथे अनस खान अतिक खान हा सात वर्षीय मुलगा अंगणात खेळत होता. त्याच वेळी एक कुत्रा धावत आला आणि त्यांच्या डोक्याला चावा घेतला यात तो गंभीर जखमी झाला असून त्यास तात्काळ रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. अनस याच्या डोक्याला चावा घेतल्याने गंभीर जखमी झाली आहे. अनस या प्राथमिक उपचार देण्यात आले असून प्रतिबंधक रेबीज इंजेक्शन ही देण्यात आले आहे. याबाबतची माहिती बालरोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र गदरकर यांनी दिली आहे.



परळी वैजनाथ डेपोची एक बस मुक्कामी जालना डेपोत आली. यावेळी बस चालक मोहन चव्हाण हे गाडी लावून डेपोकडे जात असतांना अचानक एका कुत्र्याने त्यांना चावा घेतला. त्यांनीही तात्काळ रुग्णालयात दाखल होत उपचार घेतले.

त्याच बरोबर रात्री उशिरा पुण्याहून आलेल्या एका बसच्या चालकाला मोकाट कुत्र्याने चावा घेतला. रात्री गाडी मुक्कामी असल्याने विश्रांती रुममध्ये जेवण झाल्यानंतर बाहेर निघतलेल्या या चालकाच्या पायाला कुत्रा चावला. गणेशसिंह राजपूत असे जखमी झालेल्या बस चालकाचे नाव आहे. या चालकाला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत. मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले असून महानगर पालिकेने यासंदर्भात काढलेल्या टेंडरचे काय झाले असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे. कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून सातत्याने होत आहे.

## सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण अभियान

### जिल्ह्यातील दीड हजार मुलींना मिळणार सुरक्षा कवच




**जालना । प्रतिनिधी** - लायन्स क्लब ऑफ जालना व सीव्हील क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या सहकार्याने येत्या २४ जून रोजी आझाद मैदानासमोरील सिव्हिल क्लबमध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत ९ ते १८ वयोगटातील मुलींसाठी सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधक मोफत लसीकरण अभियान राबविण्यात येणार असून, जिल्ह्यातील दीड हजार विद्यार्थ्यांना मोफत लस दिली जाणार आहे.

जिल्हाधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्या संमतीने हे अभियान राबविण्यात येत आहे. कॅन्सर पेशंट एड असोसिएशन मुंबई आणि आदित्य बिर्ला समूहाच्या सीएसआर निधीतून पूर्णतः मोफत स्वरूपात लसीकरण केले जाणार आहे. विद्यार्थिनींना लस देण्यासाठी केवळ पालकांचे संमतीपत्र आवश्यक असून, हे संमतीपत्र येत्या दोन दिवसात सिव्हिल क्लबमध्ये उपलब्ध होणार आहे. लॉयन्स क्लबतर्फे यापूर्वीही १८ फेब्रुवारी राबविण्यात आलेल्या लसीकरण मोहिमेत १०२४ विद्यार्थिनींना लस देण्यात आली होती. त्या उपक्रमाला समाजातून उदंड प्रतिसाद मिळाला. त्याचे सकारात्मक परिणामही दिसून आले आहे.

सर्वाइकल कॅन्सर हा महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर असून तो एचपीव्ही या विषाणूमुळे होतो. भारतात दरवर्षी हजारो महिलांचा मृत्यू या कॅन्सरमुळे होतो. मात्र, ९ ते १८ वयोगटात दिलेले लसीकरण अत्यंत प्रभावी ठरते व या आजारापासून ९० टक्क्यांपर्यंत संरक्षण मिळू शकते. ही लस वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध असून दीर्घकालीन आरोग्यासाठी फायदेशीर आहे. लायन्स क्लबचे सदस्य १५ जूननंतर विविध शाळांमध्ये भेट देऊन विद्यार्थिनी व पालकांना याबाबत जागरूक करून संमतीपत्रांची पूर्तता करण्यात मदत करतील.

पालकांनी आपल्या मुलींचे लसीकरण करून घेण्यासाठी लवकरात लवकर संमतीपत्रे भरून द्यावीत, असे आवाहन क्लबच्या अध्यक्षा सौ. जयश्री लड्ढा, सचिव सौ. मंजू श्रीमाली, कोषाध्यक्ष सौ. कल्पना बियानी, माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरीया सीव्हील क्लबचे अध्यक्ष ओमप्रकाश मंत्री, नरेंद्र अग्रवाल, मधुसूदन भक्कड, पंकज पाटणी, राजेन्द्र जेथलीया, सत्यनारायण दायमा, प्रदीप मुथ्था, अर्जुन गेही, अनिल गोयल आदींनी केले आहे.

## गुणवंत खेळाडु विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन

**जालना । प्रतिनीधी** - कला क्रीडा दुत फ ाऊंडेशन महाराष्ट्र, जालना जिल्हा ऑलंम्पीक असोसिएशन व शिशु विहार इंग्लिश स्कुल जालना यांच्य संयुक्त विद्यमाने सन २०२५ मध्ये दहावी व बारावी उत्तीर्ण क्रीडापटु/खेळाडु यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शालेय शिक्षण पुर्ण करत असतांनांच जे सतत मैदानवर असतात व आपल्या क्रीडा कौशल्याने ज्यांनी शालेय अथवा असोसिएशन द्वारा आयोजीत होणार्या विविध स्पर्धांमध्ये कमीत कमी विभागस्तर किंवा राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रावीण्य किंवा सहभाग नोंदवीला असेल व ज्यांना या वर्षीच्या निकालामध्ये कमीत कमी ८० टक्क्यापेक्षा जास्त गुण असतील असे सर्व खेळाडु मग ते कोणत्याही बोर्डाचे असो या सत्कार सोहळ्याकरीता पात्र असतील.

क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवीण्याकरीता तसेच त्यांना प्रोत्साहीत करण्या करीता सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नांव नोंदणी करीता दहवी/बारावीची गुण पत्रीका, खेळाचे प्रमाणपत्र व आधार कार्ड यांची झेरॉक्स पीडीएफ स्वरूपात पाठवावी. तरी जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडु विद्यार्थी यांनी या सत्कार सोहळ्याकरीता १० जुन २०२५ पर्यंत नांव नोंदणी करावी असे आवाहन कला क्रीडा दुत फाऊंडेशन महाराष्ट्र, जालना जिल्हा ऑलंम्पीक असोसिएशन व शिशु विहार इंग्लिश स्कुल जालना तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक माहीतीसाठी शेख चाँद पी.जे. मो.नं. ९८२२४५६३६६ यांच्याशी सकाळी ११ ते संध्या ५ दरम्यान संपर्क साधावा.

युवा आदर्श

### झिंगा ...

वर्षा सहली मजेत
उत्साह आला रंगा
शहारा येतो सरारा
रे शहारलेल्या अंगा
निसर्ग निर्मित झऱ्या
धबधब्या मस्त डुंबा
नशा उसळे अंतरंगा
सोबत घ्यावा खंबा
बेदरकार वागा मस्त
धोक्याचे जागी थांबा
कडे कपारी उंचावरी
लाभे अद्भुत अंचबा
मित्र मैत्रिणी सोबती
रिमझिम धारेत चिंबा
लाजलज्जा का हवी
आनंदे ठोकत बोंबा
फोटो सेल्फी हवे हवे
लाईक्स लावती रांगा
रिल्स होणार फक्कड
मद मस्त रास्त झिंगा
अघटीत घडता काही
सरकार विरूद्ध कांगा
बुकींग ओव्हर फ्लो रे
स्मशानात आधी सांगा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## १८ वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना दिला उजाळा

**मंठा । प्रतिनिधी** - अठरा वर्षानंतर शालेय जीवनातील जुन्या गोष्टीना मिळाला उजाळा स्वामी विवेकानंद विद्यायातील माजी विद्यार्थीचे स्नेह मिलन उत्साहात.याविषयी सविस्तर अशी की सन २००६-२००७ साली शिकत असलेले स्वामी विवेकानंद विद्यालय मंठा माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन सर्व माजी विद्यार्थ्यांना व शिक्षक वृदानं फेटे बांधून (ता २९) गुरुवार रोजी शहरातील माऊली मंडळ कार्यालयात स्नेह मिलन घेऊन संगीत खुर्ची गाण्याच्या भेंड्या खेळ मनसोक्त आनंद व्यक्त करून दुपारी स्नेह भोजन घेऊन शालेय जीवनातील आठवणीला माजी विद्यार्थ्यांनी उजाळा दिला

यावेळी सूत्रसंचालन साठी श्री.विजय राठोड व श्रीमती.मोनिका राठोड ,यांनी कार्यक्रमची रूपरेषा सांगून कार्यक्रमाची सुरुवात केले

तसेच शिक्षकांनी मार्गदर्शन केले. श्री मोरे सर -नाना (मुख्याध्यापक) यांनी बोलतांना सांगितले की कोणी शिक्षक,कोणी स्पर्धा परीक्षा मार्फत नोकरी ला लागले. सर्व आपल्या जिवनात व्यस्त असताना देखील उभा स्नेह मिळणात आवर्जून उपस्थित राहून शालेय जीवनातील गोष्टीना उजाळा दिला व मैत्रीनी चे नाते घट केले. यावेळी **पान ३ वर**



## दरेगाव येथील बोधिचित्त ध्यान भावना केंद्रात बुद्धमूर्तीचे अनावरण

जालना- जालना शहरालगत असलेल्या दरेगाव येथील त्रिरत्न बौद्ध महासंघाच्या विद्यमाने बोधिचित्त ध्यान भावना केंद्रात शनिवारी ( दि. ३१) बुद्धरूपी मूर्तीचे विधीमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आमदार अर्जुनराव खोतकर व भन्ते शिवली शाक्यपुत्र यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

यावेळी अनावरन समितीचे अध्यक्ष भानुदास कांबळे,जेष्ठ सामाजिक नेते ड बी. एम.साळवे , स्वागताध्यक्ष सुदामराव सदाशिवे , डॉ उमेश जाधव, डॉ राहुल राऊत ,अण्णासाहेब चित्तेकर, पंडित भुतेकर, भाऊसाहेब घुगे,महेंद्र रत्नपारखे, योगेश रत्नपारखे,पांडूरंग डोंगरे, ,लिंबाजी वाहुळकर,दिनकर घेवंदे, सलमान पठाण,संजय हेरकर , भास्कर घेवंदे, अर्जुन पाडेवार ,सुशीलकुमार वाठोरे, अशोक साबळे, प्रदीप नारायण झिने, प्रदीप रत्नपारखे आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

नियोजित उद्घाटक सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी भ्रमणध्वनीवरून संवाद साधून शुभेच्छा दिल्या. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी बौद्ध धम्माचे आचरण त्याचबरोबर प्रचाराने प्रसार किती महत्त्वाचा आहे हे सांगताना बौद्ध धम्मातील तत्त्वांवर अभ्यासपूर्ण विवेचन केले. भंते शिवली यांनी बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाची अतिशय ओघवत्या भाषेत उकल करून जनतेला विविध रूपकांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. धम्म कार्यासाठी दानदाते धम्ममित्र भानुदास कांबळे व संपूर्ण कांबळे परिवार यांचे सर्वच मान्यवरांच्या हस्ते स्वागत केले.त्रिरत्न बौद्ध महासंघ, भारतीय बौद्ध महासभा व अखिल भारतीय भिक्षू संघ हे केवळ बुद्धाच्या धम्माचा प्रचार आणि प्रसाराची जबाबदारीने कार्य करत असल्याची भावना व्यक्त केली. हरीश रत्नपारखे, हर्षदा ताई शिरसाट यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.




प्रास्ताविक धम्मचारी अरुणबोधी यांनी केले .सूत्रसंचालन धम्ममित्र प्रा.भारत साळवे यांनी तर आभारप्रदर्शन विशाल वाहुळे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धम्मचारी खशायरत्न चेअरमन ,धम्मचारी अरुणबोधी,धम्मचारी ज्ञानद, धम्मचारी शुद्धमुनी, धम्मचारिणी शशिमनी,धम्मचारिणी शशिरश्मी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली जनार्दन अण्णा चौधरी, ज्ञानेश्वर ढवळे बाळू वाहुळे, विशाल वाहुळे, राजू झिने, ॲड. विजय वाहूळे, विजय सदावर्ते, विकास वाहुळे, गौतम वाळके, **पान ३ वर**

## जालन्यात ११ लाख ५५ हजारांच्या मालासह लोडींग गाडी चोरीला

### आठ दिवसानंतरही चोरटे सापडेना

**जालना । प्रतिनिधी** - जालन्यातून ११ लाख ५५ हजारांच्या मालासह चोरट्यांनी अशोक लिलेंड क्रंमाक चक १३ द ९४०९ ही लोडींग गाडी चोरून नेलीय.शहरातील भोकरदननाका परीसरात ही घटना घडलीय. अशोक लिलेड दोस्त कंपनिची लोडींग गाडी चोरताना चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेत.घटना होऊन ८ दिवस उलटलेत तरीही पोलिसांना चोरटे सापडत नाहीय.शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्यात या चोरी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलाय.मात्र चोरटे सापडत नसल्यानं लोडींग गाडी मालक चांगलाच हतबल झालाय.या घटनेच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक चोरटा अशोक लिलेड लोडींग गाडीचा दरवाजा उघडून लोडिंग गाडी पळवून नेत असल्याचं दिसतंय. मात्र सीसीटीव्ही फुटेज हाती येऊनही सदर बाजार पोलिसांच्या हाती चोरटा न लागल्यानं अशोक लिलेंड लोडींग गाडी चालकाला नाहक मनस्ताप सहन करावा लागतोय. शेख मुजाहिद शेख मोहम्मद असे गाडी चोरीला गेलेल्या मालकाचे नाव आहे




या लोडिंग गाडीच्या माध्यमातून गाडीचालक आणि मालक असलेला मालवाहतुकीचे काम करायचा. अर्थात भाडे घेऊन तो हे काम करायचा. ही लोडिंग गाडी चोरीला जाण्याआधी त्यात काही माल ठेवलेला होता.या मालाची वाहतूक करणं बाकी होतं.ज्या दिवशी गाडी चोरीला गेली त्याआधी त्यानं माल लोडिंग करून आणला.पण माल उतरण्यासाठी वेळ लागेल म्हणून तो दुसऱ्या दिवशी हा मुद्देमाल पत्त्यावरील ठिकाणी पोहचवणार होता. मात्र रात्रीतूनच गाडी चोरीला गेली.त्यामुळे ज्या लोकांचा मुद्देमाल स्पेअरपार्ट गाडीत होता.ते लोक आता गाडी चालकाला हैराण **पान ३ वर**

# संपादकीय

## ... कठोर शिक्षा द्या

तरुण मुलांसोबत अश्लील चॅटिंग करून त्यांना जाळ्यात ओढणे आणि नंतर त्यांच्याकडून अश्लील कृत्ये करून घेणे ते करताना त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करणे. ते व्हिडीओ रेकॉर्डिंग व्हायरल करण्याची धमकी देऊन त्यांच्या कडून लाखो रुपयांची खंडणी वसूल करणे असा हातखंडा सायबर माफियांनी काही दिवसांपासून अवलंबला आहे. हाच हातखंडा आता पाकिस्ताननेही वापरला असून भारतातील संरक्षक विषयक महत्वाच्या पदावर असलेल्या व्यक्तींना सुंदर ललनांच्या जाळ्यात अडकवून त्यांच्या मार्फत भारतातील संरक्षक विषयक महत्वाची माहिती गोळा केली जात आहे. अशीच संरक्षक विषयक महत्वाची माहिती पाकिस्तानला पुरवणारा रवीकुमार वर्मा या तरुणाला पोलिसांनी नुकतेच जेरबंद केले. रविकुमार वर्मा हा एक नव्हे तर दोन पाकिस्तानी महिलांच्या संपर्कात होता. त्याने या दोन्ही महिलांना सोशल मिडियाच्या माध्यमातून वेळोवेळी भारतीय नौदल आणि डॉकयार्ड मधील पाणबुड्या व जहाजांची संवेदनशील माहिती पाकिस्तानला पाठवली होती असे एटीएसच्या चौकशीतून समोर आले आहे. रविकुमार वर्मा हा नेव्हल डॉक मध्ये ज्युनियर मेकॅनिकल फिटर इंजिनियर होता. पाकिस्तानी महिलांची रविकुमार वर्माशी सोशल मीडियावर ओळख झाल्यानंतर या महिलांनी त्याच्यासोबत अश्लील चॅटिंग करून आम्ही तुला प्रत्यक्ष भेटणार आहोत अशी भुरळ घालून त्यास या महिलांनी सतत गुंतवून ठेवले होते. त्याची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने या महिलांनी त्याला आर्थिक मदतही केली. पाकिस्तानमधून त्याच्या बँक अकाऊंटवर पैसे जमा झाल्याचेही स्पष्ट झाले आहे. रविकुमार वर्माच्या या कारनाम्याने देशभर खळबळ उडाली आहे अर्थात हनी ट्रॅपमध्ये अडकून देशाशी गद्दारी करणारा रविकुमार वर्मा हा पहिला व्यक्ती नाही. मागील वर्षीच डीआरडीओ या देशाचे संरक्षण साहित्य तयार करणाऱ्या संस्थेत शास्त्रज्ञ असलेल्या डॉ प्रदीप कुरुलकर या व्यक्तीला पोलिसांनी पाकिस्तानला देशाच्या संरक्षणासंदर्भात गुप्त माहिती पुरवल्याच्या आरोपाखाली अटक केली होती. विशेष म्हणजे डॉ कुरुलकर हे डीआरडीओ संस्थेत मागील ३८ वर्षांपासून कार्यरत होते. त्यांनी डीआरडीओच्या प्रमुख क्षेपणास्त्रांच्या प्रेक्षपक आणि ग्राउंड सिस्टीमच्या निर्मितीत महत्वाची भूमिका बजावली होती. मिशनशक्ती या उपग्रहभेदी क्षेपणास्त्राच्या प्रेक्षपकाची निर्मिती त्यांच्याच नेतृत्वाखाली झाली. डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्यासोबत त्यांनी अनेक वर्षे काम केले होते. त्यांना निवृत्त होण्यासाठी अवघी सहा महिने उरली असताना हे प्रकरण घडकीस आले. गेल्या काही वर्षांपासून ते पाकिस्तानच्या गुप्तचर विभागाच्या महिलेच्या संपर्कात होते. या महिलेने नाव बदलून त्यांच्याशी संपर्क केला. मैत्रीचे ( की प्रेमाचे ) नाटक करून त्यांच्याशी संपर्क वाढवला आणि त्यांच्याकडून देशाच्या संरक्षणासंदर्भात महत्वाची माहिती हस्तगत केली. डॉ कुरुलकर हे पाकिस्तानच्या हनी ट्रॅपमध्ये अडकल्याने देशाच्या संरक्षणा संदर्भातील अनेक महत्वाची आणि गुप्त माहिती पाकिस्तानपर्यंत पोहचली. केंद्र सरकारने याची गांभीर्याने नोंद घेऊन त्यांना त्वरित अटक केली. हनी ट्रॅप मध्ये अडकून देशाशी गद्दारी करणारे हे दोघेच नाहीत या आधीही बीएसएफचा एक जवान, अरुण मारवाह नामक वायुदलातील एक अधिकारी हनी ट्रॅपमध्ये अडकला होता. शत्रूराष्ट्राच्या गोटात शिरून त्यांच्याकडून गुप्त माहिती काढून घेणे यासाठी ललनांचा वापर करणे हे पूर्वीपासूनच चालत आले आहे. सर्वच देश हे करतात मात्र आता माहिती तंत्रज्ञान युगात हे करणे अधिक सोपे झाले आहे कारण सोशल मीडियाच्या माध्यमातून अशा महत्वाच्या पदावरील व्यक्तींना संपर्क साधने आता सहज शक्य आहे. पाकिस्तानच्या गुप्तहेर महिलांनीही हेच केले आणि रविकुमार वर्मा, डॉ कुरुलकर यांना या महिलांनी आपल्या जाळ्यात अडकवले. आता रविकुमार वर्मा यांची पूर्ण चौकशी केली जाईल त्यातून अनेक धक्कादायक माहिती समोर येईल पण देशाची संरक्षण विषयक गुप्त माहिती पाकिस्तानला मिळाली आहे त्यामुळे देशाच्या संरक्षणालाच मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळेच हनी ट्रॅप मध्ये अडकून देशाशी गद्दारी करणाऱ्या रविकुमार वर्मा सारख्या गद्दारांना कठोर शिक्षा द्यायला हवी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## लांजा तालुक्यातील गोळवशी येथील शाळांची दुरूस्ती कधी होणार ?

**लांजा -** तालुक्यातील रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या गोळवशी येथील शाळा क्रमांक २ व शाळा क्रमांक ३ दोन्ही शाळांची दुरावस्था झालेली आहे.ग्रामस्थांनी या संदर्भात तातडीने शिक्षण अधिकार्यांचे लक्ष वेधले होते.स्थानिक आमदार किरण ( भैय्या ) सामंत यांच्या निदर्शनास सदर शाळांची दुरावस्था झाली असल्याचे सांगताच त्यांनी तातडीने शिक्षण विभागास दुरूस्तीचे आदेश दिलेले असतानाही.पावसाळा सुरू झाला तरी संबंधित अधिकाऱ्यांकडून कार्यवाही झालेली नाही.१६ जून २०२५ पासून शाळा सुरू होत आहेत. दोन्ही शाळांच्या छप्पर दुरूस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करून विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी शिक्षण विभागाने घेऊन उपाययोजना करावी अशी मागणी गोळवशी ग्रामस्थांनी केली आहे.

# हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रित सिंग यांनी देशहिताच्या दृष्टीने सत्य बाजू मांडली

देशाच्या भोवताल भारत विरोधी जाळे विणले आहे यात मुख्य भूमिका चीनची असुन चीनच्या मदतीने पाकिस्तान, बांग्लादेश हे देश नेहमीच काहीतरी कुरापती निर्माण करीत असतातच. कारण यांना भारताचा विकास पहावत नाही. त्यामुळेच सिमावर्ती भागात आपल्याला आतंकवादी कारवाया मोठ्या प्रमाणात दिसून येतात.आज संपूर्ण जग अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे.त्या अनुषंगाने भारताचीही संपूर्ण तयारी सुध्दा आहे आणि त्या दिशेने जात आहे यात दुमत नाही.परंतु जेव्हा देशाच्या सुरक्षेचा प्रश्न येतो तेव्हा आपल्या जवळ संपूर्ण अत्याधुनिक सामुग्री असने गरजेचे असते.परंतु आपण जेव्हा कोणत्यांही देशा सोबत किंवा देशातील कंपनी सोबत कोणत्याही शस्त्रांचा करार यासाठी केला जातो की आपल्याला माहीत असते की या वस्तू किंवा सामग्री ठराविक वेळेपर्यंत आपल्याजवळ उपलब्ध होईल.परंतु असे होत नसल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह यांनी उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत वाजवी आणि देश हिताचा आहे असे मला वाटते. कारण देशाच्या १४० कोटी जनतेच्या सुरक्षा कवचचा प्रश्न, देशाच्या सिमावर्ती भागाचा प्रश्न आणि सैन्य शक्तीचा प्रश्न महत्त्वाचा आहे त्यामुळे कोणत्याही सुरक्षा व्यवहारामध्ये कोणत्याही प्रकारच्या करारामध्ये हयगय किंवा दिरंगाई झाली तर त्याचे प्रायश्चित्त देशाला व देशातील नागरिकांना गंभीर स्वरूपात भोगावे लागु शकतात. त्यामुळे देशाच्या सुरक्षिततेच्या बाबतीतील कोणताही करार असो तो तंतोतंत व सटीक असायला हवा यात कोणत्याही प्रकारची हयगय किंवा विलंब नकोच.भारताच्या संरक्षण खरेदी प्रकल्पांना सातत्याने होणाऱ्या विलंबाबद्दल हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी दिनांक २९ मे २०२५ ला भारतीय उद्योग महासंघाची (सीआयआय) वार्षिक शिखर परिषद दिल्लीत झाली.यावेळी हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग बोलत होते.यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, नौदल प्रमुख डमिरल दिनेश त्रिपाठी, सीआयआयचे अध्यक्ष संजीव पुरी, डीआरडीओ चे अध्यक्ष डॉ.समीर कामत आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.करारांमधील अवास्तव कालमर्यादांवर आणि कामगिरीतील कमतरतांवर स्पष्टपणे बोलण्याचे धारिष्ट्य न दाखवणाऱ्या संरक्षण अधिकाऱ्यांवरही यावेळी एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी टीका केली व सर्वांच्या उपस्थितीत एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.ते म्हणतात की अनेकदा आम्हाला करार करतांना माहीत असते की संबंधित प्रणाली कधीच येणार नाही.असा एकही प्रकल्प मला आठवत नाही जो वेळेवर पुर्ण झाला आहे. आपण असे आश्वासन का देतो,जे साध्य करता येत नाही?या शब्दात हवाई दलप्रमुखांनी आपली नाराजी व्यक्त केली. माझ्यामते हवाईदल प्रमुखांची नाराजगी देशहिताच्या दृष्टीने वाजवी असल्याचे मी समजतो.विशेषतः स्वदेशी प्रकल्पांशी संबंधित असलेल्या अनेक संरक्षण प्रणालीच्या विलंबाकडे हवाई दलप्रमुखांनी यावेळी लक्ष वेधले हलक्या लढाऊ विमानांच्या (एलसीए) प्रकल्पाचा संदर्भ देत ते म्हणाले,तेजस एमके १ए या लढाऊ विमानांसाठी फेब्रुवारी २०२१ मध्ये हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड सोबत (एचएएल) ४८ हजार कोटी रुपयांचा करार करण्यात आला. करारानुसार या विमानांचे वितरण मार्च २०२४ पासून अपेक्षित होते.मात्र मागणी केलेल्या ८३ पैकी एकाही विमानाचे वितरण करण्यात आलेले नाही.ही देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक बाब आहे.कारण ज्या विमानांचे उत्पादन आपल्याला भारतातच करायचे आहे आणि आपण कराराचे पालन करीत नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे.यावर प्रधानमंत्री, राष्ट्रपती व रक्षा मंत्रालयाने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व विलंब का होत आहे याचीही चौकशी व्हायला पाहिजे व सरकारने हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड ला जाब विचारायला पाहिजे की आपण कराराची पुर्तता का केली नाही?याकरीता हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड ला दंडीत सुध्दा करायला पाहिजे आणि भविष्यात कोणत्याही प्रकारच्या कराराच्या बाबतीत दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही अशा पध्दतीचा नोटीस सरकारने हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडला बजावला पाहिजे.कारण देशाच्या सुरक्षिततेच्या प्रश्न आहे यात कोणत्याही प्रकारची तडजोड नकोच.देशांतर्गत किंवा विदेशांतर्गत कोणत्याही प्रकारचा करार असो त्याची पुर्तता वेळेवरच झाली पाहिजे तेव्हाच त्याला योग्य करार समजल्या जाईल.ऑपरेशन सिंदूर बद्दल बोलताना हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग म्हणतात ऑपरेशन सिन्दुर चा राष्ट्रीय विजय म्हणून गौरव केला आणि ही मोहीम अंमलात आणण्यासाठी सर्व सैन्य दलांनी एकत्र येऊन काम केल्याचे सांगितले.ही बाब सत्य आहे की ऑपरेशन सिन्दुर हा राष्ट्रीय विजय आहे.त्यामुळे मी राजकीय पुढाऱ्यांना विनंती करतो की ऑपरेशन सिन्दुर बद्दल राजकारण न करता राष्ट्रीय विजय समजले पाहिजे.सरकारला विनंती करतो की रक्षा कराराच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा विलंब किंवा दिरंगाई सरकारने खपवून घेवू नये.यामुळे देशाला मोठे नुकसान होवू शकते. हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी भारतीय उद्योग महासंघाच्या व्यापार शिखर परिषदेत अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करून सरकारला जागे केले आहे याकरीता सरकारने त्यांचा सन्मान करायला पाहिजे पुढील कारवाईसाठी कठोर पावले उचलली पाहिजेत.सरकारने आतातरी अमर प्रीत सिंग यांच्या वक्तव्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील संपुर्ण कराराचे व व संरक्षण खरेदी प्रकल्पांचे तंतोतंत पालन करून यात कोणतीही दिरंगाई होणार नाही याची जातीने काळजी घ्यावी यातच खरे देश हित आहे.सन्माननीय हवाईदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी देशाच्या जनतेपुढे जी सत्यता मांडली ही बाब देश कधीच विसरणार नाही. त्याकरीता त्यांना कोटी-कोटी प्रणाम,जय हिंद, जय भारत!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**
**(महाराष्ट्र राज्य)**

# आध्यात्मिक आणि राष्ट्रीय चेतना जागवणारा सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव !

सध्या भारतासह विश्वभरात युद्धज्वर वाढत आहे. जागतिक वातावरण इतके अस्थिर आहे की, तिसर्या महायुद्धाची ठिणगी कधी पडेल, ते सांगता येत नाही. अशा वेळी सनातन राष्ट्र म्हणून भारताची विजयीपताका सर्वत्र फडकावी, तसेच भारताच्या ऊर्जेचे केंद्र असलेली सनातन शक्ती बळकट व्हावी, यांसाठी गोव्यात १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव हा भव्य सोहळा पार पडला. या सोहळ्याला भारतासह २३ देशांतील ३० हजारांहून अधिक सनातन धर्मप्रेमी उपस्थित होते. यामध्ये संत-महंत, हिंदुत्वनिष्ठ नेते, राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, साधक, धर्मप्रेमी, भाविक यांचा समावेश होता. देश-विदेशांतून अडीच लाख जणांनी हा कार्यक्रम 'लाईव्ह' पाहिला. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्यमहोत्सवी वर्ष या निमित्ताने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज जागृत करणार्या या महोत्सवाने रामराज्यरूपी हिंदु राष्ट्र निर्मितीच्या संकल्पाला आध्यात्मिक बळ दिले. त्यामुळेच हा महोत्सव म्हणजे हिंदु राष्ट्र स्थापनेच्या मार्गातील मैलाचा दगडच म्हणावा लागेल.

महोत्सवाचे केंद्रबिंदु असलेले सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून वैयक्तिक उपासनेसह म्हणजेच व्यष्टी साधनेसह समष्टी साधना करण्याचे अर्थात् धर्मरक्षण आणि राष्ट्ररक्षण यांसाठी कृतीशील होण्याचे बोधामृत दिले. महोत्सवामध्ये श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष पू. महंत रविंद्र पुरीजी महाराज, अयोध्या हनुमानगढी येथील पू. महंत राजू दास, श्रीक्षेत्र तपोभूमी (गोवा) पिठाधीश्वर पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंदाचार्य स्वामीजी, 'सनातन बोर्ड'चे प्रणेते पूज्यश्री देवकीनंदन ठाकूरजी महाराज, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपादजी नाईक, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोदजी सावंत, माजी केंद्रीय माहिती आयुक्त श्री. उदय माहुरकर, भाग्यनगरचे आमदार टी. राजा सिंह, तसेच काशी-मथुरा येथील मंदिरांचा खटला लढवणारे सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णु शंकर जैन आदी अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. संत-महंत, विचारवंत, हिंदुत्वनिष्ठ नेते यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून सनातन राष्ट्र स्थापनेसाठी केवळ वैचारिक दिशा दिली, असे नाही, तर उपस्थित प्रत्येकाला त्यासाठी कृतीप्रवण केले. या वेळी समर्पित भावाने राष्ट्र-धर्म कार्य करणार्या २५ लढवय्यांना 'हिंदु राष्ट्ररत्न' आणि 'सनातन धर्मश्री' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सनातन संस्कृती धर्मरक्षणासाठी शस्त्र आणि शास्त्र या दोन्हींचा पुरस्कार करते. त्याचा उद्घोष या महोत्सवात करण्यात आला.




**महोत्सवाची वैशिष्ट्यपूर्ण क्षणचित्रे -**

ब्राह्मतेजाचे अवतरण : १२ ज्योतिर्लिंगांपैकी प्रथम असलले सोमनाथ शिवलिंग क्रूरकर्मा महंमद गझनी यांनी उद्ध्वस्त केले होते; मात्र काही श्रद्धावान पुजार्यांनी त्या भग्नावस्थेतील शिवलिंगाच्या अवशेषांतील काही अंश अत्यंत गुप्ततेने सुरक्षित ठेवले. १००० वर्षांपूर्वीच्या शिवलिंगाचे हे दिव्य अंश महोत्सवाचे एक आकर्षण ठरले. याशिवाय संतपरंपरेतील समर्थ रामदास स्वामी, प.पू. गोंदवलेकर महाराज, प.पू. ब्रह्मानंद महाराज, प.पू. गगनगिरी महाराज, कानिफनाथ महाराज आदी १५ संतांच्या पादुका महोत्सवस्थळी विराजमान होत्या. एकाच वेळी एकाच ठिकाणी इतक्या संख्येने संतांच्या पादुका असणे, ही एक दुर्मिळ घटना आहे.

या जोडीला रामराज्याच्या निर्मितीसाठी करण्यात आलेला १ कोटी सामूहिक राम नाम जपयज्ञ, महाधन्वंतरी याग, सनातन धर्मध्वजाचे आरोहण ही या महोत्सवाची आध्यात्मिक वैशिष्ट्य होती.

सांस्कृतिक खजिना : या वेळी राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. चारुदत्त आफळे यांनी 'युद्धाय कृतनिश्चयः' हे कीर्तन सादर केले. अधर्माविरुद्ध लढण्याची वेळ आली असून धर्म आणि राष्ट्र रक्षणासाठी प्रत्येकाने कृतीप्रवण व्हायला हवे, हाच या कीर्तनाचा संदेश होता. या जोडीला महोत्सवामध्ये गायन आणि नृत्य कलेच्या माध्यमातून गुरुसंकीर्तन करण्यात आले.

धुवांधार पावसातही पार पडला शतचंडी याग : महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी महाधन्वंतरी यज्ञ पार पडल्यानंतर. भारत-पाकिस्तान युद्धात भारताचा विजय व्हावा, यासाठी शतचंडी यज्ञ होणार होता. मात्र त्याच दिवशी गोव्यात धुवांधार पाऊसाला सुरूवात झाली. मैदानावर गुडघाभर पाणी साचले होते. मात्र ज्या मुख्य मंडपात शतचंडी याग चालू होता. त्या परिसरात पावसाचा एक थंब पाणी आत आले नाही. शतचंडी यज्ञ निर्विघ्नपणे पार पडला.

क्षात्रतेजाचे जागरण : शिवकालीन ऐतिहासिक आणि दुर्मिळ शस्त्रांचे भव्य प्रदर्शन हे या महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले. या प्रदर्शनात धर्मवीर संभाजी महाराजांना औरंगजेबाने बंदिस्त करताना वापरलेले मूळ साखळदंड, सरदार येसाजी कंक यांची तलवार आणि सरदार कान्होजी जेधे यांचे चिलखत, कोल्हापूरच्या सव्यासाची गुरुकुलम आणि पुण्याच्या शिवाई संस्थान यांचे शस्त्रप्रदर्शन, गोव्यातील सौंदेकर घराण्याची प्राचीन शस्त्रे या ऐतिहासिक शस्त्रांचा समावेश होता.

या जोडीला महोत्सवातही शिवकालीन युद्धकलांची आणि स्वसंरक्षणाची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. आजच्या काळात, जेथे कट्टरपंथी आतंकवादी भारतावर आक्रमणे करत आहेत, तेथे शिवछत्रपतींच्या रणकौशल्याचा आणि शौर्याचा आदर्श 'सनातन राष्ट्र' स्थापन करण्यासाठी बळ देणारा ठरला.

आध्यात्मिक पर्यटनाला चालना : या महोत्सवासाठी आलेल्या सनातनप्रेमींनी या निमित्ताने गोव्यातील मंदिरे, ऐतिहासिक स्थळे यांना भेटी दिल्याने गोव्यातील आध्यात्मिक पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. देश-विदेशांतून आलेल्या मान्यवरांवर गोवा ही 'भोगभूमी' नसून ती 'योगभूमी' आहे, हे ठसवण्यात या महोत्सवामुळे मोठे यश मिळाले,

थोडक्यात, सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव हा देशस्तरावर आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय चेतना जागवणारा ठरला. साधना, शौर्य आणि देशभक्ती या त्रिसूत्रीवर उभा राहिलेला हा महोत्सव, उपस्थितांमध्ये भारताला हिंदू राष्ट्र म्हणून पुनःप्रतिष्ठित करण्याचा ठाम संकल्प जागृत करणारा ठरला. हा शंखनाद म्हणजे हिंदूंना आत्मविश्वास आणि दिशा रणघोष ठरला. महाभारताच्या युद्धाच्या वेळी भगवान श्रीकृष्णाने कुरुक्षेत्रावर 'पांचजन्य' शंख फुंकून युद्धाला प्रारंभ केला आणि अधर्माचा नाश होऊन धर्माचा विजय झाला. शंख हा विजय, समृद्धी, आनंद, शांती, प्रसिद्धी, कीर्ति आणि लक्ष्मी यांचे प्रतीक मानला जातो. पवित्र परशुराम भूमीत झालेला हा शंखनाद सनातन संस्कृतीच्या विजयपथाचा शुभारंभ ठरेल, हे निश्चित !

**- अभय वर्तक, प्रवक्ते, सनातन संस्था.**
**(संपर्क - ९९८७९२२२२२)**

# वर्षा भाबल ; ६२ व्या वर्षी पदवीधर



एकीकडे आजही हुंडाबळींनी समाजात प्रचंड संताप, अस्वस्थतेची भावना निर्माण होत असताना काही बाबी मात्र दिलासा देऊन जातात. पती ने पत्नीला योग्य साथ दिली तर ती तिच्या जीवनात कशी प्रगती करू शकते याचे उदाहरण नुकतेच नवी मुंबईत पहावयास मिळाले.

नवी मुंबईतील लेखिका, कवयित्री सौ. वर्षा महेंद्र भाबल यांचे गावी दहावी पर्यंत शिक्षण झाल्यावर पुढे शिकण्याची इच्छा होती.पण परिस्थितीमुळे शिक्षण न घेता ही कोकणकन्या मुंबईत आली आणि महानगर टेलिफोन निगम लिमिटेड ( एम टी एन एल - पूर्वीचे बॉम्बे टेलिफोन्स) मध्ये कामाला लागली.पुढे यथावकाश जिद्दीने केलेला प्रेम विवाह,मुलेबाळे यात आपोआप शिक्षण मागे पडत गेले.पण शिकण्याची इच्छा मनात घर करून होतीच.

तसा सौ. वर्षा महेंद्र भाबल यांनी २०१२ साली यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठात प्रवेश घेतला होता. पण पुन्हा घरगुती अडचणी येत गेल्या आणि येरे माझ्या मागल्या सुरू होऊन तो प्रयत्न असफल ठरला.पण जेव्हा त्यांनी एमटीए एल मधून २०२० मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली तेव्हा मात्र मनाचा निर्धार करून पुन्हा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठात प्रवेश घेतला आणि येत राहिलेल्या साऱ्या अडचणीवर मात करीत एकेक वर्ष यशस्वीरीत्या पूर्ण केले . याचेच फळ म्हणून नुकत्याच लागलेल्या निकालानुसार त्यांनी ६२ व्या वर्षी कला शाखेत पदवी मिळविली आहे. त्यांच्या या प्रयत्नांना पती, दोन्ही मुली आणि जावई यांनी ही योग्य ती साथ दिली .

विशेष म्हणजे त्यांचे हे यश त्यांना सतत साथ देत आलेले पती, क्रिकेटपटू श्री महेंद्र भाबल यांनी फेसबुक पोस्ट द्वारे स्वतः जाहीर करून आनंद व्यक्त केला आहे.

सौ. वर्षा महेंद्र भाबल यांनी त्यांचे जीवनप्रवास हे अत्यंत प्रेरणादायी आत्मकथन लेखमालेच्या स्वरूपात प्रथम न्यूज स्टोरी टुडे पोर्टल वर प्रसिद्ध केले. नंतर हेच आत्मकथन जीवनप्रवास या नावानेच पुस्तक रूपात प्रकाशित झाले आहे.

आपण निवृत्त झालो,म्हणजे आता आयुष्यात करण्यासारखे काही नाही,असा ग्रह अनेक स्त्री पुरुष करून घेतात. अशा व्यक्तींनी आदर्श घ्यावा, असेच सौ. वर्षा महेंद्र भाबल यांचे यश आहे. आता त्यांनी इथेच न थांबता एम ए करावे, यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा.

**लेखनःदेवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

# विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक व व्यावहारिक शिक्षण गरजेचे - संतोष जाधव

## गुणवंत विद्यार्थी सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**मंठा । प्रतिनिधी -** नियमित शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना सर्वसामावेशक कौशल्य व व्यावहारिक शिक्षण गरजेचे आहे असे प्रतिपादन संतोष जाधव यांनी केले. सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ आयोजित दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थी सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले शिक्षणाबरोबर



कौशल्य हे महत्त्वाचे आहे त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी व्यवहारिक, व्यावसायिक शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षण हे स्टेटस नाही तर ते शिक्षण घेतल्याने आपले जीवन आनंदी झाले पाहिजे. चांगलं शिक्षण घेणे म्हणजे यश नसून त्या शिक्षणातून आनंदी जीवन जगणे म्हणजेच यश होय. विद्यार्थ्यांनी संधी बघत बसू नये तर संधी तुमच्या समोर आहे व त्यावर काम केले पाहिजे. प्रत्येकामध्ये काही ना काही कौशल्य असते ते ओळखून त्या पद्धतीचे शिक्षण घेऊन त्यामध्ये व्यवसाय, नोकरी करावी. प्रत्येक विद्यार्थ्यांनी संघर्षाची तयारी ठेवावी कारण संघर्षाशिवाय यश येत नाही. यावेळी उपस्थित सपनाजी गोयल यांनी विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विविध कोर्सेस व संधी या विषयात सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भानुदास दोबाले यांनी सूत्रसंचालन राजू वाघमारे तर आभार प्रदर्शन डॉ. अमित हजारे यांनी केले. यावेळी म हेश बळक, रघुनाथ नायकवडे यांच्यासह शहरातील विविध सेवा वस्तीतील विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थीनींचा सत्कार



**परतूर । प्रतिनिधी -** येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थीनींचा सत्कार भाजपा महिला आघाडी तालुकाध्यक्ष सौ. छाया मारोती घोरबांड यांच्या हस्ते करण्यात आला. परतूर मंठा मतदार संघाचे आमदार विकास पुरुष आदरणीय बबनराव लोणीकर तथा भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.३१, में रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली होती.यावेळी गुणवंत विद्यार्थीनी दिव्या खरात. गीता शिंदे. अयोध्या येवले. शामल खरात. पूजा सरोदे. सायली लाटे. किरण खरात.वशाशकीय वैद्यकीय महाविद्यालय जालना येथे एम.बी.बी.एस. मध्ये शासकीय निवड झालेल्या सुदर्शन प्रल्हाद खरात याचाही सत्कार करण्यात आला. या प्रसंगी छायाताई घोरबांड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की मुलींच्या शैक्षणिक, आरोग्य,उद्योग, स्वयंरोजगार व महिला सुरक्षा विषयक प्रश्नावर काम करणार असून सर्वसाम ान्यांचे प्रश्न सोडविणार असल्याचे त्यांनी यावेळी आश्वासन दिले आहे.

# माळीपुरा भागात एकता भवन ईमारतीच्या एका खोलीचे छत कोसळले; सुदैवाने जिवीत हानी नाही

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील माळीपुरा भागांमध्ये एकता भवन या इमारतीमध्ये नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे सहकारी संस्थेचे कार्यालय आहे. या इमारतीमधील एका खोलीचे काल दिनांक २९ गुरुवारी रात्रीच्या सुमारास छत कोसळले.सुदैवाने रात्रीच्या वेळी कार्यालय बंद असल्यामुळे त्या ठिकाणी कर्मचारी नव्हते म्हणून कोणतीही जीवित हानी झाली नाही. म ागील काही दिवसांपासून नगरपालिकेच्या वतीने जीर्ण झालेल्या आणि मोडकळीस आलेल्या इम ारतींना नोटीसा पाठवण्याचे काम सुरू आहे. अशातच नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्था असलेल्या इमारतीमधील एका खोलीचे छत कोसळल्याने आजूबाजूच्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

घटनेची माहिती मिळताच नगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी शेजारील नागरिकांना या इम ारतीपासून लांब राहण्याच्या सूचना दिल्या. तसेच या इमारतीमधील इतर कार्यालयांना सुद्धा ब्रॅकेट करण्यात आले असून इमारत खाली करण्याच्या सूचना देण्यात आले आहेत.

# जीएसटी अनुदान मंजुर झाल्यानंतर जालना मनपात जल्लोष



**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिकेस शासना मार्फत कायद्यात आवश्यक बदल करून पुढील ५ वर्षा करिता जीएसटी अनुदान ३९२ कोटी मंजूर झाल्यानंतर महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी फटाके फोडून जल्लोष करण्यांत आला. याप्रसंगी आयुक्त तथा प्रशासक श्री संतोष खांडेकर यांनी शासनाकडे पाठपुरावा केला आणि वरिष्ठ लिपीक आंनद मोहीदे व गणेश बत्तीन यांनी जीएसटी प्रस्ताव तयार करण्याकरिता परिश्रम घेतले आहे. त्याबद्दल त्यांच्या सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर यांनी परभणी आणि लातूर महापालिका याचे पेक्षा जालना महापालिकेस जीएसटी अनुदान जास्त मंजूर झालेले आहे. जालना शहर हे स्टील हब, कृषी उत्पन्न बाजार समिती ही महाराष्ट्रातील एक मोठी बाजारपेठ आहे, शहरातील सीड उद्योग, कपडा मार्केट, लॉजिस्टिक्स पार्क, ड्राय पोर्ट तसेच विविध उद्योग व व्यापाराचे अनुषंगाने शहरातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भरण्यात येणाऱ्या जीएसटीच्या अनुषंगाने सदरील अनुदान कमी मंजूर झालेले आहे. यावेळी मुख्यलेखाधिकारी तुकाराम भिसे, मुख्यलेखपरीक्षक प्रविण निंबाळकर, सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण, शहर अभियंता सऊद, नगर अभियंता विद्युत कोमल गावंडे,कार्यालय अधीक्षक विजय फुलंब्रीकर, कर अधीक्षक राजेश कुरलीये आणि कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## शिवसेनेच्या संघटनात्मक बैठकांना प्रचंड प्रतिसाद

# निवडणुका असो अथवा नसो पक्ष संघटन अत्यंत महत्वाचे - अंबादास दानवे

**जालना । प्रतिनिधी -** पक्ष संघटन हे निवडणुका असो अथवा इतर कोणतेही कार्य असो, यासाठी अत्यंत म हत्वाचे असते. पक्ष संघटन मजबुत असेल तर आपण सर्व निवडणुका अत्यंत चांगल्या प्रकारे जिंकू शकतो, या करिता सर्वच पदाधिकार्यांनी आपआपल्या क्षेत्रात पक्ष संघटन मजबुत करण्यासाठी प्रयत्न करावेत. पक्ष संघटन मजबुत करण्यासाठी व नागरिकांना आपला पक्ष सदैव उपयोगी ठरणारा असला पाहिजे. त्यांच्या सुख-दुःखात पदाधिकारी उभा असला पाहिजे तसेच आपल्या क्षेत्रातील नागरिकांच्या अत्यंत छोट्या-छोट्या कामी त्याची मदत केली पाहिजे, असे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितले.

जालना शहरातील शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकार्यांच्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेण्यासाठी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर,उपनेते लक्ष्मणराव वडले,उपजिल्हाप्रम ुख मुरलीधर शेजुळ,माजी सभापती मुरलीधर थेटे, बाबुराव पवार,तालुकाप्रमुख हरिहर शिंदे, शहरप्रमुख बाला परदेशी, दुर्गेश काठोठीवाले, घनश्याम खाकीवाले, बाजार समितीचे माजी संचालक तुळशीदास काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हॉटेल मधबुन व हॉटेल अमित येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या कार्याच्या आढावा बैठका घेतल्या. या बैठकीस प्रचंड प्रतिसाद मि ळाला. यावेळी पुढे बोलतांना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, आगामी निवडणुका आपल्यातीलच अनेक जण उमेदवार असणार आहेत व भावी लोकप्रतिनिधीही आपल्यातील असतील. या करिता प्रत्येकांनी पक्ष संघटनेचे आवडीने काम करावे, असे आवाहन करत ते म्हणाले की, कोणतेही काम करतांना केवळ पदासाठी स्वार्थासाठी न करता जनसेवेसाठी करावे, असेही दानवे म्हणाले. संघटनेतील प्रत्येक पदाधिकार्यांची जबाबदारी अत्यंत महत्वाची आहे. प्रत्येकाने आपल्या पदाला न्याय दिला पाहिजे. तरच आपण या स्पर्धेत टिकू शकतो. येणार्या निवडणुका हे महत्वाचे उद्दिष्ट आहे. ते साध्य करण्यासाठी प्रत्येकांनी झटून काम केले पाहिजे, असेही अंबादास दानवे म्हणाले. यावेळी जिल्हाप्रमुख भास्कराव



अंबेकर म्हणाले की, जालना शहरातील दोन्ही बैठकांना उपस्थित पदाधिकारी हे अत्यंत निष्ठावंत व विश्वासू आहेत. पक्षाच्या अत्यंत कठीण काळात हे सर्व पक्षाच्या पाठीशी अत्यंत ताकदीने उभे राहिलेले आहेत. शहरातील तिनही शहरप्रमुख अत्यंत चांगल्या प्रकारे काम करीत असून संघटन मजबुत करण्याचा कसोसिने प्रयत्न करीत आहेत. उपस्थित असलेल्या सर्व पदाधिकार्यांनी आपआपल्या क्षेत्रातील सर्व बुथप्रमुख, गटप्रमुख, शाखाप्रमुख, विभागप्रमुख, उपविभागप्रमुख या सर्व नियुक्त्या झाल्याची खात्री करावी व आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने आपल्या क्षेत्रातील निवडणुक याद्यांचे वाचन करावे, स्थलांतरीत मतदार, मृत म तदार या सर्व बाबी आवर्जुन पाहाव्यात. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आपणास अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले असून पक्ष संघटना मजबुत होण्यासाठी याचा निश्चितच फायदा होणार आहे. कार्यकर्ते व पदाधिकार्यांनी कोणतेही अमिषाला बळी न पडता निष्ठेने पक्षाचे कार्य करावे, असे आवाहनही जल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले. यावेळी माजी नगरसेवक संदीप झारखंडे, संदीप नाईकवाडे, सखाराम मिसाळ, जे.के. चव्हाण, विजय शेंदरकर, रविकांत जगधने,राजु खर्डेकर, महादेव कावळे, जान महम्मद कुरेशी, निखील धारेगावकर, घनश्याम कुमठे, नंदुसिंग राजपुत, बजरंग राजपुत, शेख नईम, अनिल अंभोरे, अजय रोडीये, गजानन मगर, जयदेव काळे, दर्शन चौधरी, जय छाबडा, राम जाधव, अशिष बोकण, परमेश्वर घोलप, तुकाराम भुतेकर, सय्यद इम्रान, गणेश लाहोटी, दिपक भालेराव, कुरकण सय्यद, आकाश टेकूर, रमेश तुंगेवार, शुभम गायकवाड, अंकित बाहिती, गोपीकिशन उबाळे, कृष्णा तापडीया, राजु वैद्य, अरुण हिवराळे, तुळजाराम माधवले, चुन्नूसिंग पहेलवान आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. दरम्यान यावेळी जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव रजनीकांत इंगळे व जालना येथील शरद पवार यांनी शिवसेनेत यावेळी प्रवेश केला.

पान १ वरुन

### १८ वर्षांनंतर ...

माजी विद्यार्थी आपले मनोगत व्यक्त केले

कपिल बोराडे, सुभाष बोराडे, विजय बोराडे, किशोर झोल, कृष्णा खरात, मोसीन बागवान, अमोल ठोकरे,प्रकाश चव्हाण, रवी बोराडे, राजेश खंदारे, संभाजी काकडे,अजय वाघ, संजय चव्हाल,इमरान पठाण, ,संतोष बोराडे, सिद्धेश्वर निर्वल,गणेश घनवट, सचिन शिंदे,अशोक खराबे, मुजा खराबे ,सचिन मोरे, सोहेल शेख ,प्रशांत प्रधान,सचीन आघाव,बाळासाहेब टाके,लक्ष्मण काकडे

रणवीर सुरवसे मुलीमधून वर्षे केंद्रे, भारती लोमटे, मीना खंडागळे, शिल्पा बोरकर, माधुरी घुगे, ज्योती जोहरे, शांता घायाळ, रेखा पूरी, स्वाती वैद्य, श्रद्धा सोनटक्के, प्रियंका मगर, राधा घोगरे, रेखा शिंदे, रहीसा शेख सर्व विद्यार्थी तब्बल १८ वर्षानंतर भेटले शिक्षक वर्ग, मोरे सर, मगर सर, आघाव सर, व्हि.बी.जाधव सर, एस. एन. मोरे.सर,रमेश शिंदे, खराबे सर, सुधाकर घुगे सर, पंढरीनाथ काकडे सर या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजय बोराडे, प्रकाश चव्हाण, कृष्णा खरात, सुभाष बोराडे,किशोर झोल यांनी परिश्रम घेतले तर आभार प्रदर्शन विजय राठोड यांनी मानले.

### दरेगाव येथील ...

दिलीप मगरे, सतीश वाहुळे, कैलास वाहुळे,विलास वाहुळे, , भागचंद तिरुखे, विश्वंभर तिरुखे,भरत मगरे, शिवाजी वाहुळे,शरद वाहुळे, सुधाकर वाहुळे,जयकुमार मगरे, संदीप वाहुळे, योगेश जाधव, रवी आठवले, धनंजय हंबीर, जयदीप मगरे, आलोक वाहुळे यांनी परिशम घेतले.

याप्रसंगी जालना शहर तसेच पंचक्रोशीतील अनेक महिला व पुरुष मंडळी उपस्थित होती.

### जालन्यात ११ लाख ...

करत असून गाडी चालक मेटाकुटीला आला आहे. होईल तेवढ्या लवकर लोडिंग गाडी मिळवून देण्यात यावी अशी मागणी गाडी चालक,मालक शेख मुजाहिद्द शेख मोहम्मद याने केली आहे. वाहन मध्ये ट्रान्सपोर्ट मधून विविध दुकानाचे सामान भरले होते.

सदरील वाहनाचे आणि मालाचे विवरण पुढील प्रमाणे आहे. चार लाख रुपये किमतीची एक ASHOK LEYL-ND कंपनीची दोस्त LE नावाची लोडिंग गाडी क्रं.MH13 AX9409, २)६४,000/-रुपये किमतीचे साई गणेश आर्टो व किष्णा आर्टी मंठा चे हिरो कंपनिचे ऑईलचे १२ बॉक्स, ३) ९३,०८३/- रुपये किमतीचे सपना किराणा मंठा चे कॉस्मेटीक चे ६७ बॉक्स, ४)१२,५00/- रुपये किमतीचे बुढण आतार मंठा चे चवरंग पाट ५ बंडल, ५) ९५00/- रुपये किमतीचे सोनु फुटवेअर मंठा चे २ बंडल फुट वेयर, ६) ८५00/-रुपये किमतीचे दिव्या मोबाईल चे स्पेयर पार्ट चे १ छोटा बॉक्स, ७) २५,000/-रुपये किमतीचे राधा कृष्ण एमपोरियम मंठा चे ट्रॉली बॅग चे २ बंडल, ८) १९,५00/- रुपये किमतीचे सद्गुरु किराणाचे किराणा सामाचे दोन बंडल, ९) १५,000/- रुपये किमतीचे राधे किष्ण जनरल स्टोर्स चे कटलरी आयटम चे १ बंडल, १०) १५,000/-रुपये किमतीचे पुष्पांजली जनरल स्टोर्स चे कटलरी आयटम थे १ बंडल, ११) १,११,२१५/- रुपये किमतीचे अमर ट्रेडर्स मंठा चे स्कु थे २० बॉक्स, १२) २५,५५४/- रुपये किमतीचे वरद ट्रेडर्स मंठा चे हॅबीज पॅपर चे १५ बॉक्स, १३) २,१०,४१२ /- रुपये किमतीचे चइम नियार साडी मंठा चे कापडचे ४ बंडल, १४) ६३,८६६/- रुपये किमतीचे सरस्वती साडी मंठा चे कपड्याचे १ बंडल, १५)२५,000/-रुपये किमतीचे दिव्या मशनरी मंठा चे वायर केबल २ बंडल, १६)१२५00/- रुपये किमतीचे समर्थ मशनरि वाटुर फाटा एक कॉपर वायर बंडल, १७) ४५,000/-रुपये किमतीचे आतार कलेक्शन चे कॉलेज बॅग चे २ बंडल, अशा एकुण-११,५५,६३0 /- रुपयाचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला असून पोलीस तपासात अजून काहीही निष्पन्न झाले नसून पोलीसांनी लवकरात लवकर तपास करावा असे अवाहन गाडी मालक शेख मुजाहिद्द शेख मोहम्मद यांनी केले आहे.

# सिंधीकाळेगाव येथे खरीप हंगाम पूर्व कार्यशाळेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील सिंधी काळेगाव येथे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली खरीप हंगाम पूर्व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी विष्णु राठोड यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन, तूर, मूग, उडीद पिकाची बीज प्रक्रिया व उगम क्षमता चाचणी करूनच पेरणी करावी असे आवाहन केले. कृषी सहाय्यक श्रीमती सोनवणे मॅडम यांनी बियाणे उगवण क्षमता चाचणी व बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखविले व त्यामुळे उत्पादनात होणारी वाढ बाबत महत्त्व पटवून दिले.मंडळ कृषी अधिकारी रवि राठोड यांनी बियाणे, खते खरेदी करताना पक्क्या बिलाचा आग्रह शेतकऱ्यांनी दुकानदारास करावा, शक्यतो प्रमाणित बियाणेच खरेदी करावे असे आवाहन केले. प्रगतशील शेतकरी विष्णुपंत गिराम यांनी स्वतः राबविलेल्या



एस आर टी (सगुणा रीजेनेरीटिव्ह टेक्निक) या आधुनिक पद्धतीने शेती करावे असे आवाहन शेतकऱ्यांना केले. या आधुनिक पद्धतीमुळे खर्च कमी, जमिनीची धूप कमी होते, सेंद्रिय कर्ब वाढतो, पाणी व्यवस्थापनात सुधारणा होते, पण नियंत्रणास मदत होते. एकंदरीत खर्च कमी होऊन उत्पादनात दीड ते दोन पट वाढ झाल्याचे शेतकऱ्यांना सांगितले.यावेळी तालुका कृषी अधिकारी विष्णू राठोड यांनी विष्णुपंत गिराम यांच्यासारखी शेती करावी तसेच जोडवळ पद्धतीने , बीबीएफ पद्धतीने पेरणी करावे त्यामुळे म ूलस्थानी जलसंधारण होऊन पाण्याचा योग्य वापर व पीक व्यवस्थापनात मदत होते याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी श्रीमती प्रियंका क्षीरसागर कृषी पर्यवेक्षक विजयकुमार वाघमारे, ढगे सर, सरपंच सुभाष गिराम कृषी सहाय्यक एस के राठोड, एस एस कमाने, मिलिंद घोरपडे, चेतन बोरुडे, श्रीमती.वर्षाराणी कुलकर्णी श्रीमती पुष्पा शिंगणे,ग्रामसेवक चोधर .भगवान गिराम. परसराम गिराम,दत्ता गिराम ज्ञानेश्वर गडकरी, सुधाकर मुळे, जगन्नाथ मुळे आदी उपस्थित होते.

# वादळी वाऱ्याने कंडारी शिवारात फळबाग व सोलारचे मोठे नुकसान

**परतूर । प्रतिनिधी** - घनसावंगी तालुक्यातील काकडे कंडारी येथे गेल्या दोन दिवसा पासून अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे नागरिकांच्या घरावरील पत्रे उडाली आहेत.तसेच शेतात बसविलेले सोलार प्लेट वादळी वाऱ्याने उडाल्या मुळे ते फुटले.अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



अवकाळी वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने शेतातील पिकासह फळबागांची नुकसान झाली आहे. गावातील घरावरचे पत्रे उडाल्या ने गावात काही तास भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घनसावंगी तालुक्यातील काकडे कंडारी शिवारातील प्रल्हाद आप्पासाहेब मगर यांच्या गट क्रमांक ३३१ मध्ये सोलार पॅनल प्लेट वादळी वाऱ्याने फुटल्याने मोठे नुकसान झाले आहे. शासनाने या नुकसानीची भरपाई देण्याची मागणी शेतकरी प्रल्हाद आप्पासाहेब मगर यांनी केली आहे.







हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.